Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ११, अंक ३९]    गुरुवार ते बुधवार, ऑक्टोबर २३-२९, २०२५/ कार्तिक १-७, शके १९४७    [पृष्ठे ६, किंमत : रुपये ८.००

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग एक-अ-अमरावती विभागीय पुरवणी

————

**(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

————

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २१४.

**संचालक, नगर रचना, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.**

**आदेश**

क्रमांक डि.टी.पी.-वि.यो.वरूड-कलम-१२७(२)-आदेश-टिपीव्ही-६-६०५४.—

ज्याअर्थी, वरूड नगर परिषदेची विकास योजना [ मूळ (सुधारित) + वाढीव ] महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७ वा) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधिले आहे) चे कलम ३१ (१) मधील तरतुदी-नुसार शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टिपीएस-२८०३-१८९६-प्र.क्र.८(A)-२००४-नवि-३०, दि. १५ जुलै, २००५ (यापुढे "उक्त अधिसूचना" असे संबोधिले आहे) अन्वये भागशः मंजूर झाली असून, ती दि. ०१ सप्टेंबर, २००५ पासून अंमलात आलेली आहे; (यापुढे “उक्त मंजूर विकास योजना” असे संबोधिले आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर सुधारित विकास योजनेमध्ये, मौजा वरूड येथील स. नं. २५८ या जमिनीचे २.२३८ हे. क्षेत्र आ. क्र. ७, “आठवडी बाजार” या आरक्षणाने (यापुढे “उक्त आरक्षण” असे संबोधिले आहे) बाधित होत असल्याचे उक्त मंजूर विकास योजना अहवालावरून दिसून येते आणि उक्त आरक्षणाचे भूसंपादन व विकासासाठी समुचित प्राधिकरण हे नगरपरिषद, वरूड हे आहे (यापुढे “उक्त समुचित प्राधिकरण" असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त मंजूर विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून १० (दहा) वर्षाच्या कालावधीत उक्त आरक्षणाखालील जमिनीचे संपादन केलेले नाही;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणाखालील मौजा वरूड येथील स. नं. २५८ या जमिनीचे एकूण ३.४४ हे. क्षेत्रापैकी उक्त आरक्षणाने

बाधित क्षेत्राबाबत (यापुढे "उक्त जमीन" असे संबोधिले आहे) संबंधित जमीन मालक (यापुढे "उक्त जमीन मालक" असे संबोधिले आहे) यांचेवतीने ॲड. श्री. जी. के. मुंधडा यांनी उक्त अधिनियमाचे कलम १२७(१) चे तरतूदीन्वये उक्त समुचित प्राधिकरणावर दि. २० जुलै, २०२३ रोजी सूचना (यापुढे "उक्त सूचना" असे संबोधिले आहे) बजावली असून, ती वरूड नगर परिषदेस दि. २४ जुलै,२०२३ रोजी प्राप्त झाली होती;

आणि ज्याअर्थी, उक्त सूचना बजाविल्याच्या दिनांकानंतर उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त सूचनेनुषंगाने दि. ०६ मे, २०२४ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, अमरावती यांना भूसंपादन करणेकरीता प्रस्ताव सादर केला असला तरी, उक्त सूचना बजाविल्याच्या दिनांकानंतर उक्त समुचित प्राधिकरणाने, विहीत मुदतीत उक्त आरक्षणाखालील उक्त जमीन संपादित केलेली नाही अथवा उक्त अधिनियमाच्या कलम १२६(४) चे तरतूदीमध्ये नमूदप्रमाणे भूसंपादनाची अधिसूचना प्रसिद्ध केलेली नाही,

आणि ज्याअर्थी, मुख्याधिकारी, नगर परिषद, वरूड यांनी पत्र क्र. १५८३/२०२५, दि.११ ऑगस्ट, २०२५ अन्वये, विषयांकित आरक्षणाने बाधित जमिनीचे संपादन करणेकरीता निधी मिळणेबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, अमरावती यांचेमार्फत शासनास सादर केला आहे व असा निधी प्राप्त होताच भूसंपादन करण्यात येणार असल्याने, उक्त अधिनियमाच्या कलम १२७(२) चे तरतूदीन्वये कार्यवाही करण्यात येवू नये, असा प्रस्ताव सादर केला आहे;

आणि ज्याअर्थी, सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती यांनी पत्र क्र. ८२६, दि. १६ सप्टेंबर, २०२५ अन्वये, वरूड नगरपरिषदेने भूसंपादनाचा प्रस्ताव सादर केला असला तरीही उक्त अधिनियमाच्या कलम १२७ (१) चे तरतूदीन्वये आरक्षणाचे संपादनाकरीता उक्त सूचना बजाविल्याच्या दिनांकापासून २४ महिन्यांच्या कालावधीत उक्त अधिनियमाच्या कलम १२६ (२) किंवा १२६ (४) चे तरतूदीन्वये अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिद्ध झालेली नसल्याने, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीन्वये आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे, असा अहवाल सादर केला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणाचे एकूण क्षेत्र २.२३८ हे. नमुद असले तरी, सदर विकास योजना मंजूर होताना त्यामध्ये क्षेत्रवाढ झाली असून, सहायक संचालक, नगर रचना, अमरावती शाखा कार्यालयाने सादर केलेल्या विकास योजना भाग नकाशावर दर्शविलेनूसार उक्त आरक्षणाचे एकूण क्षेत्र २. २८ हे. आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त जमिनीवरील उक्त आरक्षणाबाबतची उपरोक्त नमूद वस्तुस्थिती विचारात घेता, उक्त जमिनीचे २.२८ हे. क्षेत्रावरील उक्त आरक्षण उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीन्वये व्यपगत झाल्याबाबतचे आदेश निर्गमित करणे क्रमप्राप्त झाले आहे, असे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाचा निर्णय क्र. टिपीएस १८१३/३२११-प्र.क्र.५०८-नवि-१३, दि. ०१ डिसेंबर, २०१६ अन्वये नियोजन प्राधिकरण असलेल्या सर्व नगरपरिषदा / नगर पंचायती-जिल्हा परिषदा यांच्या विकास योजना संबंधाने, उक्त अधिनियमाचे कलम १२७(२) चे तरतूदीन्वये कार्यवाही करण्याचे शासनाचे अधिकार कलम १५१ चे तरतूदीन्वये संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केलेले आहेत;

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतूदीन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे, या आदेशाद्वारे पुढील परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण भागशः व्यपगत झाले आहे, असे अधिसूचित करीत आहेत आणि त्यासाठी उक्त मंजूर विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे-

उक्त मंजूर विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेच्या बदलांच्या परिशिष्टामधील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नविन नोंदीचा समावेश करण्यात येत आहे

**परिशिष्ट**

| अ.क्र. | नगर परिषद, मौजा, तालुका व जिल्हा | उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त आरक्षण व वि.यो. अहवालानुसार अंदाजे क्षेत्र (हे.) | उक्त जमिनीचा तपशील | उक्त आरक्षणाचे व्यपगत झालेले अंदाजे भागशः क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | | | (हे.) |
| १. | वरूड नगर परिषद, मौजा वरूड, ता. वरूड, जि. अमरावती. | आ. क्र. ७, "आठवडी बाजार" क्षेत्र - २.२३८ हे. | स. क्र. २५८ पै. | २.२८ हे. |

**टीप** :— १. उक्त आरक्षणामधून मुक्त झालेली उक्त जमीन ही लगतच्या जमिनीवर उक्त मंजूर विकास योजनेनुसार अनुज्ञेय होणाऱ्या विकासाच्या प्रयोजनासाठी उक्त जमीन मालकांना उपलब्ध होईल.

२. उक्त आरक्षणामधून मुक्त झालेल्या उक्त जमिनीचे क्षेत्र दर्शविणारा उक्त मंजूर विकास योजनेचा भाग नकाशा हा मुख्याधिकारी, नगर परिषद, वरूड, जि. अमरावती यांच्या कार्यालयात, कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत, नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्यापर्यंत खुला ठेवण्यात येत आहे.

३. सदर आदेश संचालनालयाचे ***www.dtp.maharashtra.gov.in*** या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**जितेंद्र ल. भोपळे,**
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे :
दिनांक १० ऑक्टोबर, २०१५.

————

भाग १-अ(अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २१५.

BY DIRECTOR OF TOWN PLANNING

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

*ORDER*

No. D.T.P-D.P. Warud[O(R)+A]-Sec-127(2)-Order-TPV-VI-6054.—

Whereas, the Development Plan of Warud Municipal Council [Original (Revised) + Additional] has been partly sanctioned under the provisions of section 31 (*1*) of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") by the Government in Urban Development Department *vide* Notification No. TPS-2803-1896-CR-8 (A)-2004-UD-30, dated 15th July, 2005 (hereinafter referred to as "the said Notification") & has come into force with effect from 01st September, 2005 (hereinafter referred to as "the said Sanctioned Development Plan");

And whereas, in the said Sanctioned Development Plan and as specified in the Development Plan Report, the land bearing S. No. 258 of Mouza Warud is affected by the Reservation Site No. 7, "Weekly Market" admeasuring approximately 2.238 Ha. (hereinafter referred to as "the said Reservation") and the Appropriate Authority for the acquisition and development of the said Reservstion is Municipal Council, Warud (hereinafter referred to as "the said Appropriate Authority");

And whereas, the land affected by the said Reservation has not been acquired by the said Appropriate Authority within 10 (ten) years from the date on which the said Sanctioned Development Plan has come into force;

And whereas, on behalf of the concerned land owner (hereinafter referred to as "the said Land Owner") of the Land bearing S. No. 258 admeasuring approximately 3.34 Ha. from which area affected by the said Reservation (hereinafter referred to as "the said Land"), Adv. Shri. G. K. Mundhada had served a notice as per the provisions of section 127(*1*) of the said Act, (hereinafter referred to as "the said Notice") on the said Appropriate Authority on 20th July,2023 and same has been received by the Warud Munical Council on 24th July, 2023;

And whereas, however the said Appropriate Authority has submitted the land acquisition proposal to the Collector, Amravati on 06th May, 2024, the said Land under the said Reservation is not acquired or the notification as mentioned in the -provisions of section 126(*4*) is not issued by the said Appropriate Authority within the stipulated period from the date of service of the said notice served by the said land owner;

And whereas, the Chief Officer, Municipal Council, Warud *vide* Letter No. 1583/2025 dated 11th August, 2025 has submitted a proposal stating that, a proposal for allocation of funds for acquisition of land affected by the said Reservation has been submitted to the Government through the District Collector, Amravati and upon receipt of such funds, the land acquisition process will be undertaken, hence no action under the provisions of section 127(*2*) of the said Act would be initiated;

And whereas, the Joint Director, Town Planning, Amravati Division, Amravati, *vide* Letter No. 826 dated 16th September, 2025, has submitted a report stating that although the Municipal Council, Warud, has submitted a land acquisition proposal, no notification under the provisions of section 126(*2*) or 126(*4*) of the said Act has been published in the *Official Gazette* within a period of 24 months from the date of service of the said notice under the provisions of section 127(*1*) of the said Act for the acquisition of the said land. Therefore, it is necessary to issue an order under the provisions of Section 127(*2*) of the said Act;

And whereas, although the total area of the said Reservation is stated as 2.238 Ha. the said area has been increased at the time of sanctioning of the said Development Plan; and as per the part plan of the said Reservation submitted by the Assistant Director, Town Planning, Amravati Branch Office, the total area of the said Reservation is 2.28 Ha;

And whereas, after considering the above facts in respect of the said land affected by the said Reservation, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune is of the opinion that, it is appropriate to issue an order declaring that the reservation on area admeasuring 2.28 Ha. of the said land has lapsed under the provisions of Section 127(*2*) of the said Act;

And whereas, the Government in Urban Development Department as per the provisions of section 151 of the said Act, *vide* Resolution No.TPS-1813/3211/CR- 508/UD-13, Dated 01st December, 2016, has delegated the powers exercisable by it as per the provisions of section 127 (*2*) of the said Act, in respect of Development Plans of all Municipal Councils/Nagar Panchayat and for the Development Plans undertaken by Zilla Parishad as a Planning Authority, to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune;

Now therefore, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, by this order and as specified in the Schedule hereinafter hereby notify the lapsing of the said Reservation in respect of the said land as per the provisions of section 127(*2*) of the said Act & for that purpose amends the said Notification of the said Sanctioned Development Plan, as follows -

After the last entry in the Schedule of Modifications accompanying the said Notification of the said Sanctioned Development Plan, the following new entry shall be added :-

SCHEDULE

| Sr. No. | Municipal Council, Mouza, Taluka and District | Proposal in the said Sanctioned Development Plan & its Approxi. Area as per D.P. Report | Description of the Land | Approximate Area lapsed of the said Reservation (Ha.) |
|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) |
| 1. | Warud Municipal Council, Mouza Warud, Tal. Warud, Dist. Amravati. | Reservation No. 7, "Weekly Market" Area- 2.238 Ha. | S. No. 258 (Pt.) | 2.28 Ha. |

*NOTE* :- 1. The said Land so released from the said Reservation shall become available to the said Land Owners for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent land under the said Sanctioned Development Plan.

2. A copy of the part plan of the said Sanctioned Development Plan showing the area of the said land which is lapsed from the said Reservation, is available in the office of the Chief Officer, Municipal Council, Warud, District Amravati during office hours on all working days for inspection to public upto one month.

3. This Order shall also be published on the Directorate's official website

*www.dtp.maharashtra.gov.in*

JITENDRA L. BHOPLE,
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.

Pune:
Dated the 10th October, 2025.

————

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २१६.

**प्रशासक तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये दुसरी सुधारित विकास योजनेत फेरबदल करणे**

**शुध्दीपत्र**

क्रमांक नपवा-नियो-कार्या-१४-३१९९- २०२५.—

या कार्यालयाचे पत्र क्र. नपवा-नियो- कार्या-१४-सर्व्हे नं. ४०९/१, ४०९/१/अ/ व सर्व्हे नं. ४२२/२ जा.क्र. ३४१९/२०२३, दिनांक १३ डिसेंबर, २०२३ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये मराठी व इंग्रजी सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक -अ अमरावती विभागीय पुरवणी मध्ये दिनांक डिसेंबर २१-२७, २०२३ रोजी पान क्र. ६ व ७ वर प्रसिध्द करण्यात आलेली असून सदर प्रसिध्द झालेल्या मराठी व इंग्रजी सूचनेमध्ये पुढील प्रमाणे दुरुस्ती वाचावी. -

**या ऐवजी**

ज्याअर्थी, उक्त मंजूर वाशिम शहराची दुसरी सुधारित विकास योजना मध्ये मौजा वाशिम येथील शेत सर्व्हे नं. ४०१/१, ४०९/१अ व ४२२/२ मधील (क्षेत्रफळ ५.६३ हेक्टर आर ) ही जागा कृषी क्षेत्रात समाविष्ट असून नगर परिषदेने मा.प्रशासक, नगर परिषद, वाशिम यांचा ठराव दिनांक ०८ डिसेंबर, २०२३ अन्वये उक्त जागा ही कृषी क्षेत्रामधून वगळून निवासी वापर क्षेत्रात समाविष्ट करणे करीता ठराव पारीत केला आहे.

In the said Development Plan, S.No 409/1, 409/1A & 422/2 ( area of 5.63 H.A.) is included as Green Zone & Municipal Council, Washim *vide* Administrator Resolution dated 08$^{th}$ December, 2023 has decided to make Modification in Development Plan and proposed that the above said land of S.No 409/1, 409/1A & 422/2 (area of 5.63 H.A.) shall deleted from Green Zone and to be included in Residential Zone.

**असे वाचावे**

ज्याअर्थी, उक्त मंजूर वाशिम शहराची दुसरी सुधारित विकास योजना मध्ये मौजा वाशिम येथील शेत सर्व्हे नं. ४०९/१, ४०९/१अ व ४२२/२ मधील (क्षेत्रफळ ५.६३ हेक्टर आर ) ही जागा कृषी क्षेत्रात समाविष्ट असून नगर परिषदेने मा.प्रशासक, नगर परिषद, वाशिम यांचा ठराव दिनांक ०८ डिसेंबर, २०२३ अन्वये उक्त जागा ही कृषी क्षेत्रामधून वगळून निवासी वापर क्षेत्रात समाविष्ट करणे करीता ठराव पारीत केला आहे.

In the said Development Plan, S.No. 409/1, 409/1A & 422/2 (area of 5.63 H.A.) is included as Green Zone & Municipal Council, Washim *vide* Administrator Resolution dated 08$^{th}$ December, 2023 has decided to make Modification in Development Plan and proposed that the above said land of S.No. 409/1, 409/1A & 422/2 (area of 5.63 H.A.) shall deleted from Green Zone and to be included in Residential Zone.

उर्वरित अधिसूचना प्रसिध्दीमध्ये कोणतेही बदल नाही.

**निलेश गायकवाड,**
प्रशासक तथा मुख्याधिकारी,
नगर परिषद, वाशिम.

वाशिम :
दिनांक १० ऑक्टोबर, २०२५.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.